# निरीक्षक/अधिक्षक, दिव्यांग संस्था, गट-ब
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
## Inspector/Superintendent, in the Institutes for Disabled Persons, Group-B
## Social Justice and Special Assistance Department

**परीक्षेचे टप्पे:-** १) लेखी परीक्षा- २०० गुण २) मुलाखत - ५० गुण

## -: परीक्षा योजना :-

| विषय व सांकेतांक (११०१) | माध्यम | प्रश्नसंख्या | गुण | कालावधी | दर्जा | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | मराठी | १०० | २०० | एक तास | बारावी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| विषयाशी / विभागाशी संबंधित घटक | | | | | पदवी | |

**अ) नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित असेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

**ब) अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारीत राहील.**

## -: अभ्यासक्रम :-

**विषयाशी/विभागाशी संबंधित घटक यामध्ये खालील घटक व उपघटकांचा समावेश असेल.**

| अनु क्रमांक | घटक व उपघटक |
|---|---|
| १ | **मराठी** - सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग इ. |
| २ | **माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान** -<br>माहिती तंत्रविज्ञानाचा अर्थ, संकल्पना फायदे-तोटे, व्याप्ती, माहिती-तंत्र विज्ञानातील संक्षिप्त रुपे व परिभाषा, इंटरनेटचा उपयोग, माहिती व तंत्रज्ञान कायदा, २०००, संगणक ऑपरेटिंग सिस्टिम |
| ३ | **दिव्यांग कल्याण प्रशासन** -<br>दिव्यांग निवासी संस्था व्यवस्थापन,<br>भोजन व निवास सुविधा व्यवस्थापन,<br>निवासी संस्थांमधील आपत्ती व्यवस्थापन,<br>मुलींच्या सुरक्षितता बाबत उपाययोजना व खबरदारी, प्रथमोपचार |
| ४ | **निवासी संस्था बांधकाम तंत्रज्ञान** -<br>पर्यावरण स्नेही बांधकाम तंत्रज्ञान, दिव्यांगांसाठी सहज सुलभ संचार व्यवस्था |
| ५ | **निवासी संस्थांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व सर्वांगीण विकास** -<br>स्वयंशिस्त, बंधुभाव, सकारात्मक विचारसरणी, सद्सदविवेकबुध्दी या गुणांची जोपासना, व्यसनमुक्ती, दिव्यांगांसाठी पूरक साधने, क्रीडा साधने, विशेष भाषा व लिपी यांचे महत्व, अँटी रॅगिंग कायदा |
| ६ | **सामान्य विज्ञान** -<br>अनुवंश शास्त्र, अनुवंशिक आजार, दिव्यांगत्व प्रतिबंध उपक्रम, दिव्यांगासाठी उपयुक्त भौतिकोपचार, शस्त्रक्रिया व तंत्रज्ञान, मूलभूत तसेच दिव्यांगासाठी उपयुक्त संगणक तंत्रज्ञान, दिव्यांगांसाठी देश विदेशातील संशोधन |
| ७ | **आरोग्य व पोषक आहार — (Health and Nutrition)**<br>चौरस आहार, आरोग्य, विद्यार्थी वाढीच्या अवस्था, किशोर/पौंगडावस्थातील शारीरिक व मानसिक बदल, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व नियम २०११ |

| | |
|---|---|
| ८ | **भारतीय राज्यव्यवस्था, कल्याणकारी राज्य व कल्याणकारी कायदे -**<br>भारतीय राज्य घटना (प्रास्ताविका, मूलभूत हक्क विशेषत: समानतेचा हक्क, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, पंचायत राज व्यवस्था)<br>दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ (PWD Act 2016)<br>राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे, आईवडिल व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम |
| ९ | **भारतीय सामाजिक समस्या कारणे व उपाय -**<br>दिव्यांग, मागासवर्गीय व गरिबांच्या समस्या व उपाय<br>दिव्यांगांचे सक्षमीकरण,<br>दिव्यांगासाठी स्वयं रोजगार/रोजगार निर्मिती<br>शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांच्या समस्या व उपाय,<br>महिलांच्या समस्या व उपाय<br>महिलांचे सक्षमीकरण |
| १० | **आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास -**<br>ग्रामीण समाजजीवन, बलुतेदारी पध्दत, जमीन धारणा मधील असमानता, विविध पध्दती जमीनदारी, रयतवारी, महालवरी, खोती पध्दत, स्वतंत्र भारतातील जमीन मालकी सुधारणा उपक्रम, भूदान चळवळ,<br>समाजसुधारक व मान्यवरांचे कार्य :- शिक्षण, निवासी संस्था व दिव्यांग कल्याण |
| ११ | **भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा भूगोल -**<br>हवामान बदल, कारणे परिणाम व उपाय, नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तींचे परिणाम व व्यवस्थापन, जैव विविधता |
| १२ | **भारतीय अर्थव्यवस्था -**<br>आर्थिक विकास व नियोजन – पंचवार्षिक योजनाचा इतिहास, निती आयोग व राष्ट्रीय विकास परिषद, सूक्ष्म नियोजन, बेरोजगारी, कौशल्य विकास व स्वयंरोजगार, शाश्वत विकास |
| १३ | चालू घडामोडी, दिव्यांग कल्याणार्थ यशोगाथा, राष्ट्रीय स्तरावरील दिव्यांग कल्याणार्थ पुरस्कार प्राप्त स्थानिक स्वराज्य संस्था उदा. रायगड व अकोला जिल्हा परिषद, नवी मुंबई महानगरपालिका यांचे कार्य, पॅराऑलिम्पिक मधील खेळाडू तसेच विविध दिव्यांग व्यक्ती यांच्या यशोगाथा |
| १४ | सामाजिक संरक्षण योजना उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना |
| १५ | बुद्धिमत्ता चाचणी व सामान्य गणित, तर्कसंगत कारण मीमांसा (Analytical and Logical reasoning) |

**दिनांक – १० मे, २०२४**

**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**